महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

स्पार्क संस्थेचे जोकीन आर्पुदम व महानगरपालिकेचे उप अभियंता यांच्या संगनमताने शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(१) **३२०१४ (२१-०१-२०१६). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य रेल्वेच्या उपनगरीय स्थानकांवर वाढणारा प्रवाशांचा ताण लक्षात घेवून रेल्वे बोर्डाने कुर्ला ते ठाणे रेल्वे स्थानकांच्या दरम्यान ५ वा व ६ वा असे दोन मार्ग टाकण्याच्या निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करुन शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन धोरणाप्रमाणे पात्र ठरणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे बहुमजली इमारतीतीत पक्क्या व स्वयंपूर्ण सदनिकांत पुनर्वसन करण्याचे राज्य शासनाने ठरविले व या कारणाकरिता तत्कालिन नगरविकास खात्याचे प्रधान सचिव श्री.जॉनी जोसेफ यांच्या स्वाक्षरीने दिनांक २७ मार्च, १९९८ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयाने झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करण्याचे काम स्पार्क या बिगर शासकीय संस्थेला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाच्या मालकीच्या जमिनीवर विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) नुसार प्रकल्पग्रस्तांकरिता झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याची जबाबदारी स्पार्क या बिगर शासकीय संस्थेला देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणात स्पार्क या बिगर शासकीय संस्थेचे (एनजीओ) जोकीन आर्पुदम व वादग्रस्त ठरलेले बृहन्मुंबई महापालीकेचे उपअभियंता श्री.विलास खर्चे या दोघांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संगनमताने कट करुन दिनांक ३० सप्टेंबर, २०१० रोजी एक आशयपत्राने स्पार्क संस्थेला उप विकासक व श्री.विलास खर्चे यांना परवानाधारक सर्व्हेअर म्हणून नियुक्ती करण्यात आले, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, या योजनेद्वारे ५३,५४३ चौरस मीटर क्षेत्रफळाचा हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) मिळाल्याने या व्यवहारात शासनाचा महसूल सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(७) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) होय. गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण दिनांक १२ मार्च, १९९७ च्या क्र. एमआयएस-१०९४/ सीआर-५५८/स्लम-२ व क्र.प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दि. १२ डिसेंबर, २००० च्या शासन निर्णयाद्वारे सदर प्रकल्पाने बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी जागतिक बँकेच्या निकषांची पुर्तता करण्यासाठी एमयुटीपीसाठी पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण मंजूर केले होते.
(५) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी मेसर्स स्पार्क हे उपविकासक असून त्यांचे मार्फत श्री.विलास खर्चे यांची परवानाधारक सर्व्हेअर म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदर योजनेस दिनांक २३.०९.२०१० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत इरादापत्र निर्गमित करण्यात आले आहे.
(६) हे खरे नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यातील विविध विकास कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२) ३३१२३ (१६-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्याती विविध विकास कामे करण्याकरीता अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अर्थ व महसूल मंत्री यांना दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनास प्राप्त विविध निवेदनांच्या अनुषंगाने मालेगाव महानगरपालिकेस पुढील प्रमाणे निधी वितरीत केला आहे.

सन २०१४-२०१५ - पायाभूत रु.५.८० कोटी विशेष अनुदान रु.६.०० कोटी

सन २०१५-२०१६ - पायाभूत - रु.५ कोटी हद्दवाढ- रु.५.८० कोटी विशेष अनुदान- रु.५ कोटी

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, गायमुख, मुंब्रा, कळवा, कोपरी, पारसिक, नवीन ठाणे इत्यादी भागात जलवाहतूक सुरु करण्याबाबत

(३) ५९८१९ (२६-०८-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे, गायमुख, मुंब्रा, कळवा, कोपरी, पारसिक, नवीन ठाणे इत्यादी भागात जलवाहतूक सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, तसेच, सदर प्रस्तावास केव्हापर्यंत मंजूरी मिळणे अपेक्षीत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) : (१) याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाचे परिवहन मंत्रालय (Ministry of Shipping), दिल्ली व भारतीय अंन्तर्देशीय जलमार्ग प्राधिकरण (Inland Waterways Authority of india) यांच्याकडे सादर केला आहे.

(२) सदर प्रस्तावाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे:-

- Inland Water Transport (IWT) अंतर्गत जलवाहतुकीसाठी प्रथम टप्प्यासाठी वसई ते कल्याण हा मार्ग क्र. १ प्रस्तावित आहे.
- याअंतर्गत "कोलशेत" येथे इंटरमोडेल ट्रान्सफर हब व इतर ठिकाणी जेटी बांधून अनुषंगिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत.
- महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड तसेच विविध मनपा व संस्था यांची संयुक्त कंपनी स्थापन करुन त्या महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डासमवेत सामंजस्य करार (MOU) करणार आहेत. या प्रस्तावास ठामपाने मान्यता दिली आहे.
- या प्रकल्पाच्या अभ्यासासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे.

याकरीता सल्लागाराच्या टी.ओ.आर. (Term of Reference) ला मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डामार्फत इनलॅन्ड वॉटर वेज अथोरिटीज ऑफ इंडिया यांना सादर करण्यात आला आहे.

राज्यातील २ हजार २०० कंत्राटी कामगारांना घरे देण्याबाबत

(४) ६१४५८ (२६-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २ हजार २०० कंत्राटी कामगारांना पंतप्रधान घरकुल योजना व महाजेनकोची जागा देऊन कमीत कमी किंमतीत घरकुल देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१२-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) कोराडी विद्युत केंद्रामध्ये कंत्राटी कामगार तसेच कोराडी High Tension Line खाली वसलेल्या लोकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाजेनकोच्या महादुल्ला आणि लोणारा येथील जागेवर २०१६ EWS घरकुलांच्या प्रकल्प अहवालास (DPR) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने दि.३०.९.२०१६ च्या बैठकीत मंजुरी दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजीव गांधी निवारा योजना क्र.२ व्याजाच्या रक्कमेचे प्रस्ताव

(५) ६३२७९ (२९-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दारिद्ररेषेवरील उत्त्पन्न गटातील कुटुंबांना घरकुलासाठी राजीव गांधी निवारा योजना क्र.२ मधून १ लाखाचे बिनव्याजी कर्ज दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्ज रकमेवरील व्याजाची रकम म्हाडा बँकांना अदा करणार होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व बँक अधिकाऱ्यांनी २००८ पासून व्याज रक्कमेचे प्रस्ताव म्हाडाकडे पाठविले नसल्याने लाभार्त्यांवर कर्जाचा बोजा वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व बँक अधिकाऱ्यांनी म्हाडाकडे प्रस्ताव पाठविले नसल्यास, संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (०३-०१-२०१८) : (१) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या कुटुंबाचे उत्पन्न रु.९६,०००/- पेक्षा कमी आहे अशा कुटुंबांना रु.१,००,०००/- पर्यंतच्या प्रति घरकुल बांधकाम खर्चाला मान्यता दिली आहे. त्यामध्ये रु.९०,०००/- हे बँकेकडून कर्ज दिले जाते व त्यावरील १० टक्के या कमाल मर्यादेपर्यंत होणा-या सरळ व्याजाची रक्कम महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत भरली जाते.
(२) होय.
(३) लाभार्थ्यांनी बँकाकडून प्राप्त रु.९०,०००/- कर्जाची परतफेड रु.८३३/- इतक्या मासिक हप्त्यामध्ये १० वर्षामध्ये करावयाचे आहे व व्याजाची रक्कम म्हाडाकडून भरली जाते.
(४) सुधारीत राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रमांक २ ची प्रभावीपणे व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याची व त्या दृष्टीने या योजनेचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी एकत्रितपणे संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व बँक अधिका-यांनी व्याज रक्कमेचे परतावे म्हाडाकडे पाठविले नसल्याची कोणतीही तक्रार किंवा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील बोपखेल ते दापोडी दरम्यानचा बंद केलेला रस्ता सुरु करण्याबाबत

(६) ७६९०६ (१४-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड, बोपखेल ग्रामवासीयांनी, बोपखेल ते दापोडी दरम्यानचा रस्ता, लष्कराने बंद केल्यामुळे येथील गावक-यांना, १० मिनिटाच्या अंतरासाठी, वळसा घालून किमान १० कि.मी. अंतर कापण्यास १ तासाहून अधिक वेळ लागत असल्याने येथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.

(३) असल्यास, चौकशीनुसार जिल्हाधिकारी, केंद्रीय संरक्षण विभागाचे अधिकारी यांची शासनाने तातडीने संयुक्त बैठक घेवून अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या पुलाचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) याप्रकरणी संबंधीतांसमवेत वेळोवेळी बैठका झालेल्या असून नविन कायमस्वरूपी पूल बांधण्याचे आराखडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तयार केलेले आहेत. सदरचे आराखडे/नकाशे संरक्षण विभाग, केंद्र शासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त बोर्ड ऑफ ऑफिसर कडे मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत.

भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेचा घनकचरा रामनगर येथील गार्डनसाठी आरक्षित असलेल्या मैदानावर टाकला जात असल्याबाबत

(७) ७७५१० (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) येथे दररोज जमा होणारा ३५० मे.टन कचरा चाविंद्रा रामनगर येथील मैदानांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर टाकण्यात येत असल्यामुळे तेथील नागरिक व ९०० विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डम्पिंग ग्राऊंडमधील केमिकल व प्लास्टिकयुक्त कचऱ्यामुळे परिसरातील भातशेती नापीक झाल्याने शेतकऱ्यांनी शेती लागवड बंद झाल्याबाबतच्या अनेक तक्रारी नागरिक, स्वराज अभियान या संघटनेने शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चाविंद्रा रामनगर येथील डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) : (१) नाही.

परंतु, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका दैनंदिन कचऱ्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबवित आहे :-

- भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील दैनंदिन स्वरूपात जमा होणारा ४०० ते ४५० टन कचऱ्याची विल्हेवाट सद्यस्थितीत महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या १० एकर जागा असलेल्या सिटी पार्कच्या जागेवरील चांविद्रा-रामनगर येथे विल्हेवाट लावण्यात येत आहे.
- सदर ठिकाणी कचरा टाकल्यावर बुलडोझरद्वारे कचरा सपाटीकरण करून भुमीभरण करण्यात येते.
- शहर क्षेत्रातील दैनंदिन स्वरुपात जमा होणारा कचरा डंपिग ग्राऊंड येथे टाकल्यानंतर सदर कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरू नये व तेथील स्थानिक नागरिकांचे आरोग्य अबाधित राहणेकरीता सकाळ व सायंकाळ सत्रात औषध फवारणी पथकामार्फत स्प्रेपंपाद्वारे जंतुनाशक औषध फवारणी करतात.
- तसेच अत्यावश्यक म्हणून जेटीग मशीनद्वारे सुध्दा फवारणी करणेची व्यवस्था करण्यात येते.

(२) व (३) मौजे दापोडा तालुका भिवंडी येथील सर्व्हे नं.११५ पैकी क्षेत्र २६.०७२ हेक्टर ही शासकीय जमीन जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दिनांक ११.०२.२००० च्या आदेशान्वये भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन (संस्करण व विल्हेवाट-डंपिग ग्राऊंड) या प्रयोजनासाठी मंजूर आहे.

घनकचरा व्यवस्थापन या प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या व अग्रिम ताबा दिलेल्या आदेशाविरुध्द ग्रामपंचायत दापोडे यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.८४५७/२००८ या दाखल केलेल्या रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने शासनाने प्रधान सचिव, महसुल विभाग यांचे अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या समितीने ग्रामपंचायत दापोडे, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची सुनावणी घेऊन त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर २ महिन्याच्या आत शासनाकडे अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

तद्नंतर ग्रामपंचायत दापोडे, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची सुनावणी सदर समितीसमोर दोन वेळा झाली आहे. उक्त समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांनी सादर केलेल्या कन्सेप्ट प्लॅनबाबत

(८) ८०५४४ (२१-०४-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांनी सन २०११ मध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी पुढील ४० वर्षाकरिता कन्सेप्ट प्लॅन चे प्रारुप तयार करुन त्याबाबतचे सादरीकरण मुख्य सचिव व इतर अधिका-यांसमोर माहे जानेवारी,२०१३ मध्ये केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या मेट्रोपॉलिटन प्लॅनिंग कमिटीच्या मंजुरीनंतर सदर कन्सेप्ट प्लॅन मधील अभ्यासपुर्ण बाबींचा समावेश प्रारुप सुधारित प्रादेशिक योजनेमध्ये करण्याचे अभिप्रेत असून सदर प्रारुप प्रादेशिक योजनेस महानगर नियोजन समितीची मान्यता व शिफारस प्राप्त होऊन तसा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) : (१) होय.
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या प्रस्तावित प्रादेशिक योजना २०१६-३६ च्या पुर्वतयारीसाठी विविध अभ्यास करण्यात आलेले होते. त्यापैकी कन्सेप्ट प्लॅन हा एक महत्वाचा अभ्यास होता. सदर अभ्यासातील प्रस्तांवाची पडताळणी करुन योग्य प्रस्तावांचा प्रारुप प्रादेशिक योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर प्रारुप योजनेस मुंबई महानगर नियोजन समितीने दिनांक ८/७/२०१६ रोजी झालेल्या तिस-या बैठकीत मंजूरी दिली आहे. सदर प्रादेशिक योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १६(१) अन्वये दिनांक १९/९/२०१६ रोजी हरकती/ सुचना मागविण्याकरीता प्रसिध्द केली आहे. सदर प्रारुप प्रादेशिक योजना महानगर नियोजन समितीकडे सादर झालेली आहे. सदर प्रारुप प्रादेशिक योजना महानगर नियोजन समितीमार्फत शासनास मान्यतेसाठी प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहर, उपनगर आणि महापालिका हद्दीलगतच्या अनधिकृत बांधकामांना आळा बसण्याबाबत

(९) ८२२०५ (०६-०५-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर, उपनगर आणि महापालिका हद्दीलगतच्या अनधिकृत बांधकामांना आळा बसण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान सेट लाईट इमेज यंत्राबाबत महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच मागील दीड ते दोन वर्षाच्या कालावधीत हे काम पूर्ण करण्यास प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे अपयश आल्याने महानगरपालिका प्रशासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामांमध्ये विलंब करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२) व (३) शासनाच्या दि.६.५.२०१६ च्या शासन निर्णयानुसार सॅटेलाईट इमेज खरेदीबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

करंजाडे (ता.पनवेल,जि.रायगड) गावातील आदिवासी बांधवांना स्मशानभूमीसाठी सिडको विकसित करीत असलेल्या करंजा नोडमध्ये जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(१०) ८५०८३ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजाडे (ता.पनवेल, जि.रायगड) गावातील आदिवासी बांधवांना स्मशानभूमीसाठी सिडको विकसित करीत असलेल्या करंजा नोडमध्ये जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि.बेलापूर यांच्याकडे माहे जून, २०१७ वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागात सिडकोने वसाहत निर्माण करण्यापूर्वी अनेक वर्ष वास्तव्य करित असलेला आदिवासी समाज अंत्यविधीसाठी वस्तीच्या नजीकच्या जागेचा वापर करीत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडकोमार्फत निर्माण करण्यात येणाऱ्या वसाहतींमुळे उक्त गावातील आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा शिल्लक न राहिल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको विकसित करीत असलेल्या करंजाडे नोड विभागात आदिवासी बांधवाना अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) : (१) व (२) होय.
(३) व (४) सिडकोने करंजाडे नोडमध्ये सेक्टर-५ मधील भूखंड क्र. ८१ ते ८४ मधील सुमारे ८००० चौ.मी. जागेवर स्मशानभूमी व दफनभूमी संकुलाचे नियोजन केले आहे. त्यापैकी भूखंड क्र. ८१ वरील सुमारे १२०० चौ.मी. जागेवर सिडकोने स्मशानभूमी विकसित केली असून सदर सुविधा सर्व समाजांसाठी उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे मोताळा (जि.बुलडाणा) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत म्हाडाची गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याबाबत

(११) ८५०९५ (०१-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोताळा (जि.बुलडाणा) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत म्हाडाची गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनधींचे निवेदन दिनांक १९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोताळा येथे गृहनिर्माण योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (०२-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र शासनाच्या दि. १६ जून, २०१७ रोजीच्या पत्रानुसार मोताळा शहराचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनास प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार दि. २७.९.२०१७ च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये मोताळा शहराचा प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत समावेश केला आहे. तथापि, अनावधनाने मोताळा शहराचा समावेश भंडारा जिल्हयात दर्शविण्यात आला आहे. याबाबत दुरुस्ती प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांचा विकास रखडला असल्याबाबत

(१२) ८५२०४ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये दिनांक ११ सप्टेंबर, १९९७ रोजी समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांचा विकास रखडला असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या २३ गावांमधून घरपट्टी, पाणीपट्टी व विविध आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मधून व गुंठेवारी मधून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असतांना महानगरपालिकेकडून ह्या गावांकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते, मलनिःसारण व्यवस्था, खेळाचे मैदान, पाणीपुरवठा अशा मुख्य गरजांपासून समाविष्ट झाल्यापासून २३ गावे वंचित असतांना शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२) व (३) ११ सप्टेंबर १९९७ रोजी पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांमध्ये अंदाजपत्रकीय मान्य उपलब्ध तरतुदीनुसार मान्य विकास आराखड्यातील पाणीपुरवठा विभागाअंतर्गत रस्ते व अंतर्गत रस्ते विकसन व देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.

मलनि:सारण बंदिस्त व्यवस्था प्रत्येक वर्षी पुणे मनपाच्या अंदाज पत्रकात उपलब्ध झालेल्या निधी नुसार विविध ठिकाणी मलवाहिनी टाकणे व बाणेर व खराडी या ठिकाणी मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प बांधून कार्यान्वित करण्यात आलेली आहेत तसेच वारजे व वडगाव या भागासाठी एरंडवणे व विठ्ठलवाडी येथे मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित केलेले आहेत.

महानगरपालिका हद्दीतील मैलापाणी गोळा करणे व त्यावर प्रक्रिया करणे या अंतर्गत बाणेर, वडगाव, वारजे ई. मैलापाणी शुध्दीकरण केंद्राची कामे जायका प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावित केलेली आहेत. तसेच बाणेर बालेवाडी मध्ये व मनपा हद्दीत विविध ठिकाणी मलवाहीन्या अशा स्वरुपाची कामे प्रस्तावित आहेत.

मान्य विकास आराखडयातील पाणीपुरवठा विभागाअंतर्गत पाण्याची लाईन्स व पाण्याच्या टाक्यांचे योजना करण्यात आल्या आहेत.

अंदाजपत्रकीय मान्य उपलब्ध तरतुदीनुसार मान्य विकास आराखडयातील खेळाच्या मैदानांसाठी आरक्षित असलेल्या आणि पुणे मनपाच्या ताब्यात आलेल्या जागांची विकसनाची कामे करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नालासोपारा (जि.पालघर) पश्चिमेकडील समेळपाडा लिटल पन्लॉवर शाळेच्या मागे अनधिकृत इमारत उभारल्याबाबत

(१३) ८५२९३ (२३-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) पश्चिमेकडील समेळपाडा लिटल पन्लॉवर शाळेच्या मागे घन्सार चाळ जुना सर्वे क्र.५६ आणि नवीन ११ हिस्सा क्र.६ या जागेवर विकासक प्रदीप सिंग यांनी दोन ५ मजली इमारती उभारल्या असून त्यापैकी ए विंग मधील ५ मजली इमारत अनधिकृत असल्यामुळे ती बांधणाऱ्या विकासक प्रदीप सिंग यांचेविरोधात कारवाई करुन सदर बेकायदेशीर इमारत पाडावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रॉबर्ट लोपीस यांनी महानगरपालिका आयुक्त सतिश लोखंडे, उपायुक्त अजिज शेख यांचेकडे वारंवार केल्याची बाब दिनांक ६ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक महिने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यानंतर आंदोलनाचा ईशारा देऊन आंदोलन केल्यानंतर संबंधित विकासक प्रदीप सिंग विरोधात गुन्हा दाखल करुन इमारतीवर कारवाई करण्याचे आदेश आयुक्त सतिश लोखंडे व उपायुक्त अजिज शेख यांनी नालासोपाऱ्यातील सहाय्यक आयुक्त प्रकाश जाधव यांना दिल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्तांनी सदर आदेश देऊनही, उपायुक्तांनी संबंधित विकासक प्रदीप सिंग विरोधात कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यास हेतूत: विलंब व टाळाटाळ केली असल्याचे निदर्शनस आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रदीप सिंग यांच्या विरोधात गुन्हा नोंदवून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१८) : (१) होय.

तक्रारदार यांनी प्रभारी सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती-ई यांचेकडे दिनांक २२.०३.२०१७ व दिनांक २७.०३.२०१७ तसेच प्रभाग समिती-ई, सभापती यांचेकडे दिनांक ०२.०६.२०१७ रोजी तक्रारी अर्ज केल्याचे निदर्शनास येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नालासोपारा (जि.पालघर) पश्चिमेकडील समेळपाडा लिटील फ्लॉवर शाळेच्या मागे घन्सार चाळ जूना सर्वे नं. ५६ आणि नवीन ११ हिस्सा नं. ६ या जागेवरील अनधिकृत बांधकाम विकासक श्री.जितेंद्र बबन सिंग यांच्यावर दिनांक १७.०३.२०१७ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१/३४ अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्तर-पूर्व परिक्षेत्रातील क्षेपण भूमीतील भरावास वारंवार लागणाऱ्या आगीबाबत

(१४) ८५३३१ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्तर-पूर्व परिक्षेत्रातील क्षेपण भूमीतील भरावास वारंवार लागणाऱ्या आगीमुळे स्थानिकांचे जीवित व मालमत्ता विषयक हानीतून होणारे नुकसान वाढत असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पर्यावरण विषयक बाबींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित आहे,
(३) असल्यास, अशा महानगपालिका व खासगी संस्थांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

तथापि, मुलुंड क्षेपणभूमी येथे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी किरकोळ स्वरुपात आग लागली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पर्यावरण विषयक बाबींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

• मुलुंड क्षेपणभूमी येथे कचऱ्यातून बाहेर पडणाऱ्या ज्वलनशील वायुंचा हवेशी संपर्क होऊ नये याकरिता सदर ठिकाणी येणाऱ्या दैनंदिन कचऱ्याचे सपाटीकरण करुन त्यावर डेब्रिजचा थर पसरविण्यात येतो.

• तसेच, आग प्रतिबंधक योजना म्हणून क्षेपणभूमी येथे ४ अग्निशामक टँकर रात्रंदिवस तैनात करण्यात आले आहेत.

• सदर अग्निशामक टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी क्षेपणभूमीच्या आवारात बोरवेल बसविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये राबविल्या जाणाऱ्या दत्तक वस्ती योजना बंद होण्याच्या स्थितीत असल्याबाबत

(१५) ८५६७२ (२३-०८-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये राबविल्या जाणाऱ्या दत्तक वस्ती योजना बंद होण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत काम करणाऱ्या कामगारांना तुटपुंजे मानधन मिळत असल्याने कामगारांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्ट्यांमध्ये ७५० लोकसंख्येमागे एक कामगार असून त्याला दिले जाणाऱ्या तुटपुंज्या मानधनामध्ये स्वयंसेवी संस्थाही हिस्सा घेत असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे कामगारांची आर्थिक कुचंबना होत असल्यामुळे या योजनेकरिता कामगार उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या असंघटीत कामगारांचा आर्थिक स्तर वाढविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये अशासकीय संस्थांमार्फत सन २००१ पासून राबविण्यात आलेली "दत्तक वस्ती योजना" एप्रिल २०१३ पासून बंद करण्यात येऊन, संपूर्ण मुंबई शहरात "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ७५० लोकसंख्या किंवा १५० कुटुंबे म्हणजे एक एकक असे प्रमाण ठरवून त्यांच्या परिसरात सार्वजनिक स्वच्छता राखण्यासाठी संस्थेला लागणारे साहित्य व अवजारे यांची खरेदी, स्वयंसेवकांसाठी सुरक्षा साधने, दैनंदिन स्वच्छता, पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन खर्च म्हणून रु. ५४००/- प्रति एकक प्रति माह आणि जबाबदारी स्विकारलेल्या पात्र संस्थेला योजना कामांमध्ये प्रबोधन, लोकसहभाग, जनजागृती, वातावरण निर्मिती इत्यादी अनुषंगिक खर्च करणे शक्य व्हावे याकरिता रु. ६००/- प्रति एकक प्रति माह असे एकूण रु. ६०००/- प्रति एकक प्रति माह सहाय्य अनुदान स्वरुपात देण्यात येते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या प्रलंबित धोरणाअभावी कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेले व्यापारी गाळे दुर्लक्षित असल्याबाबत

(१६) ८५८८३ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या प्रलंबित धोरणाअभावी कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेले व्यापारी गाळे दुर्लक्षित असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील अंध, अपंग आणि आर्थिक दुर्बल घटक वर्गातील गरजूंकडून सदरचे गाळे भाडेतत्वावर मिळण्यासाठीच्या मागणीचे हजारो अर्ज प्राप्त असतांना महानगरपालिका प्रशासनाकडून कुठलीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि अंध, अपंग आणि आर्थिक दुर्बल घटक वर्गातील गरजूंचे होत असलेले हाल लक्षात घेता शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२) व (३) मिळकत व्यवस्थापन नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार अंध, अपंग व्यक्ती समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण अधिनियम, १९९५ मध्ये नमूद प्रवर्गातील पात्र व्यक्तीस अथवा त्यांचे नोंदणीकृत संस्थेस प्राधान्य देण्यात येते.

त्यानुसार उपलब्ध व्यापारी संकुल गाळ्यांसाठी काही संस्थांनी मागणी केलेली होती. पुणे महानगरपालिकांमार्फत ताब्यात येणाऱ्या व्यावसायीक गाळ्यांमध्ये अंध, अपंग, आर्थिक दुर्बल घटक वर्गातील गरजूंना ठराविक प्रमाणात पात्रतेनुसार आरक्षण देण्याविषयी कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे पुणे महानगरपालिकेकडून गाळे भाडेतत्वावर मिळणेबाबत कुठलीच कार्यवाही होत नाही हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई येथील बेलापूर ते पेंधर दरम्यान सुरू करण्यात येणारी मेट्रोची सुविधा तळोजा एमआयडीसी परिसरात विस्तारित करण्याबाबत

(१७) ८६०४७ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील बेलापूर ते पेंधर दरम्यान सुरू करण्यात येणारी मेट्रोची सुविधा तळोजा एमआयडीसी परिसरात विस्तारीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ वा त्या दरम्यान व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., सीबीडी-बेलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू असून ते लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर असून मेट्रोची सुविधा तळोजा एमआयडीसी पर्यंत वाढविल्यास जवळपास तीन लाख कामगारांना येण्या-जाण्यास सोयीस्कर होणार असून महसूलातही मोठया प्रमाणात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात मेट्रो सुविधा दिल्यास कामगारांना भेडसावणारी अपुरी वाहतूक व्यवस्था दूर होण्यास मदत होवून दररोज मोठया प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तळोजा एमआयडीसीपर्यंत मेट्रो सेवा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) : (१), (२) व (३) होय.

(४) तळोजा एमआयडीसीपर्यंत मेट्रो सेवा देण्यासंदर्भात दि.२७.७.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर प्रकल्प सिडको व एमआयडीसी यांच्या योग्य प्रमाणात किंमत सामाईकीकरण (Proportionate Cost Sharing Basis) तत्वावर राबविण्यास एमआयडीसीने तत्वत: मान्यता दिली आहे. सिडकोने पेंधर ते तळोजा एमआयडीसी या मेट्रो लाईन क्र.३ चा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारितील मे.राईटस लि. या संस्थेस दिले असून प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर एमआयडीसीची औपचारिक मान्यता घेऊन प्रकल्प अंमलबजावणीची पुढील कार्यवाही सिडकोकडून करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात म्हाडातर्फे अल्प गटातील उत्पन्नधारकांना निवासी गाळे व भूखंड या स्थावर मिळकतीवर बांधकाम करुन वितरण केल्याबाबत

(१८) ८६३२० (०१-०९-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात म्हाडातर्फे अल्प गटातील उत्पन्नधारकांना निवासी गाळे व भूखंड या स्थावर मिळकतीवर बांधकाम करुन वितरण केलेल्या गाळयांपैकी अनेक मिळकती बिगरशेती झालेल्या नाहीत अथवा बिगरशेती झालेल्या नोंदी सात-बारावर नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१२-१२-२०१७) : (१) हे खरे नाही.

शासनामार्फत पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळास प्राप्त झालेल्या जमिनीवर विविध उत्पन्न गटांतर्गत सदनिका / भूखंडाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. जमीन म्हाडास प्राप्त झाल्यानंतर महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एनएनए-१०७२/२८९९६-सी-II, मंत्रालय, मुंबई, दि.२३.०१.१९७३ नुसार म्हाडा गृहनिर्माणासाठी जमीन वापरत असल्यास बिगर शेती परवानगीची आवश्यकता नाही. म्हाडामार्फत प्रत्येक वर्षी सदर जमिनीचा बिगरशेतसारा संबंधित तहसिलदार यांच्याकडे भरण्यात येतो.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्हमातील २९ गावांमधील तत्कालीन ग्रामपंचायतीमध्ये सेवारत असलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत

(१९) ८६७२६ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या रायगड जिल्हमातील २९ गावांमधील तत्कालीन ग्रामपंचायतीमध्ये सेवारत असलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत तातडीने समाविष्ट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ रोजी वा त्या दरम्यान मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे निवेदनाद्‌वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील २९ गावांच्या २३ ग्रामपंचायतीमध्ये सेवारत असलेल्या कर्मचाऱ्याचे पनवेल शहर महानगरपालिकेमध्ये समावेशन करण्याचे धोरण निश्चित करण्याकरिता शासनाने मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०१६ पासून वेतन किंवा सानुग्रह अनुदानही देण्यात आले नसल्यामुळे कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांची आर्थिक अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, २३ ग्रामपंचायतीमधील एकूण ३८४ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमध्ये समावेशन करण्यासाठी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१८) : (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) सदर कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०१६ पासूनचे वेतन देण्यात आलेले आहे. उक्त कर्मचाऱ्यांच्या महानगरपालिकेत समोवशनाच्या प्रस्तावाबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या समितीमार्फत कार्यवाही सुरू आहे.

दिनांक ०१.१०.२०१६ पासून संक्रमण कालावधीतील वेतन व भत्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, ४९३ अन्वये ६ महिन्याचे कालावधीतील वेतन पनवेल महानगरपालिकेने अदा केले आहे.

तथापि, दिनांक ०१.१०.२०१६ पूर्वी ग्रामपंचायत स्तरावरील ३८४ कर्मचाऱ्यांना सानुग्रह देणेबाबत ग्रामपंचायत स्तरावरील कालावधीचा निर्णय जिल्हापरिषद अखत्यारीत येत असल्याने त्या कालावधीचे सानुग्रह अनुदान अदा केलेले नाही. तथापि, सन २०१६-१७ चे सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.
(४) दिनांक २७.०२.२०१७ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठणे) शहराला लागून असलेल्या वडोल गावच्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याबाबत

(२०) ८७१८१ (२३-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठणे) शहराला लागून असलेल्या वडोल गावच्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे बांधकाम बंद करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त यांनी दिले असतानाही ठेकेदाराने पुलाचे बांधकाम सुरूच ठेवले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम तोडून पुन्हा नव्याने काम सुरू करावे अन्यथा ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याचे संकेत आयुक्तांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) : (१) व (२) अशा आशयाच्या बातम्या माहे मे, २०१७ मध्ये स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर पुलाच्या कामाच्या दर्जाबाबत पत्रकार, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीवरुन संबंधित ठेकेदाराला दिनांक २६ मे, २०१७ रोजी पुलाच्या बांधकामाचा तपासणी अहवाल प्राप्त होईपर्यंत काम बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या.

(३) सदर पुलाच्या कामाचा दर्जा राखणे, निविदा अटी व शर्तीप्रमाणे कामे नियमितपणे करण्याकरिता संबंधित एजन्सीला वारंवार पत्र तसेच नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

तसेच सदर कामाकरिता वापरण्यात आलेल्या बांधकाम क्युबची शासकीय तपासणी करुन घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मद्य विक्रेते व ज्वेलर्स यांचेकडून जकात व दंडापोटीची रक्कम वसुली करणेबाबत

(२१) ८७८९८ (२३-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मद्य विक्रेते व ज्वेलर्स यांचेकडून सन २०१३ पासून जकात व दंडापोटीची वसुली सुमारे ४०७.३७ कोटी रुपये थकीत असून महारनगरपालिकेकडून कमी प्रमाणात वसुली करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षापासून शासनाच्या कोट्यवधीचा महसूल बुडत असल्याची बाब समोर आली असतानाही महानगरपालिका प्रशासनाने जाणून बुजून दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिका-यांवर शासन दंडात्मक कारवाई करणार आहे काय, तसेच ७०४ कोटी ३६ लाख रु. पैकी किती रक्कम वसूल करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या जकात / दक्षता विभागामार्फत नियमित जकात वसुलीकरीता आवश्यक प्रयत्न केलेले आहेत. नियमित जकात मागणी रक्कम १५.५ कोटी व १० पट शास्ती रक्कम १५५.०९ कोटी इतकी आहे अशी एकूण वसुली योग्य रक्कम रुपये १७०.५९ कोटी आहे. परंतु १० पट शास्ती लावण्याचे अधिकार न्यायालयाचे असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) रुपये १६०.७७ कोटी इतकी वसुली होणे बाकी आहे.

या प्रकरणी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिनांक १५.०३.२०१७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

- या प्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द आवश्यकतेनुसार प्रशासकीय व फौजदारी कारवाई चार आठवड्यात करावी.
- या प्रकरणी ज्वेलर्स व मद्यविक्रेते यांनी चुकविलेला जकात, त्यावरील दंड व सर्व अनुषांगिकबाबी तसेच इतर सर्व थकबाकी व्याजावरील रक्कमेच्या वसुलीबाबत व्यक्तीश: लक्ष घालून तीन महिन्याच्या कालावधीत नियमानुसार वसुली करावी.

ठाणे (जि.ठाणे) येथील खेळाची मैदाने विकासकांच्या ताब्यात देण्याबाबतचा निर्णय

(२२) ८८१५४ (२३-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) येथे लोकांसाठी खेळाच्या मैदानांची संख्या कमी असताना सध्या अस्तित्वात असलेली खेळाची मैदाने विकासकांच्या ताब्यात देण्यात येईल असा धोरणात्मक निर्णय ठाणे महानगरपालिकेने घेतला असल्याचे दिनांक २२ मे, २०१७ वा त्या सुमारस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे घोडबंदर परिसरातील भाईंदर पाडा येथील सुमारे ३५ हजार चौरस क्षेत्रफळाचे मैदान देखभाल आणि संवर्धनाच्या नावाखाली एका बड्या विकासकाच्या ताब्यात ३० वर्षासाठी गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या निर्णयामुळे शहरातील कोणत्याही मैदानावर यापुढे विकासकाकडून हक्क सांगण्यात येईल त्यामुळे ठाणेकर रहिवाशांमध्ये प्रचंड असंतोष पसरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१८) : (१), (२), (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील ठेकेदार तसेच त्यांना मदत करणाऱ्या मुख्य लेखा व वित्त प्राधीकाऱ्यांमधील आर्थिक गैरव्यवहाराबाबत

(२३) ८८२८४ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील ठेकेदार तसेच त्यांना मदत करणाऱ्या मुख्य लेखा व वित्त प्राधीकाऱ्यांमधील तथाकथित आर्थिक गैरव्यवहारांच्या संदर्भात उच्चस्तरीय चौकशीची मागणी स्थानीय सर्वसामान्य नागरिक व जनप्रतिनिधी, नागरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास), मुख्य-सचिव, अतिरिक्त मुख्य-सचिव

(नगरविकास), भिवंडी-निजामपूर महापालिका आयुक्त व आयुक्त मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याकडे केली असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय वा दंडात्मक उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१८) : (१) होय, हे अशंत: खरे आहे.

दिनांक २३.०९.२०१६ रोजी तक्रार प्राप्त झालेली असून दिनांक ०९.०३.२०१७ अन्वये तक्रार मागे घेण्यात आली आहे.

(२) व (३) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने त्यांच्या संकेतस्थळावर प्रलंबित देयकांची यादी, देयके काढण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना व बांधील खर्चाचा तक्ता प्रसिध्द केला आहे. याप्रमाणे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नव्या बांधकामाबाबत असलेल्या बंदीच्या आदेशावर फेरविचार तसेच देवनार व मुलुंड कचरा क्षेपणभूमी वरील उपाययोजना करण्यासाठीची मागणी

(२४) ८८२९३ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नव्या बांधकामाबाबत असलेल्या बंदीच्या आदेशा संदर्भात महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्री या बांधकाम व्यावसायिक संघटनेने फेरविचार करण्याची मागणी तसेच देवनार व मुलुंड कचरा क्षेपणभूमीवरील उपाययोजना करण्यासाठीची मागणी सदर परिक्षेत्रातील स्थानीय लोकप्रतिनिधी, नागरिकांनी व भोगवटदरांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास), मुख्य-सचिव, अतिरिक्त मुख्य-सचिव (नगरविकास), मा.महानगरपालिका आयुक्त व आयुक्त मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण, महामुंबई तसेच त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्री या बांधकाम व्यावसायिक संघटनेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अन्वये बांधकाम बंदी उठविण्याबाबत जनहित याचिका क्रमांक २१७/२००९ मध्ये रिव्ह्यु पिटीशन क्रमांक ३७२०/२०१७ दाखल केले होते.

सदर प्रकरणी मा.न्यायालयाने बांधकाम बंदी उठविण्यास नकार दिला असून, मा.सर्वोच्च न्यायालयात बंदी उठविण्याबाबत याचिका दाखल करण्यात आली आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

राजगुरुनगर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूला असलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करणेबाबत

(२५) ८८४०९ (२३-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर राजगुरुनगर येथे एस.टी.बस स्थानकासमोर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा असून पुतळ्याच्या आजूबाजूला अतिक्रमण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उपविभागीय अधिकारी,खेड यांच्या अध्यक्षतेखाली राजगुरुनगर नगरपरिषदेमध्ये महसूल,सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग, महामार्ग पोलीस विभाग व राजगुरुनगर नगपरिषद यांच्या संयुक्त कारवाईने अतिक्रमणे काढण्याचे बैठकीत ठरले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर बैठकीच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूचे तसेच महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याबाबत अद्यापपर्यंत काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे दि.२६.१०.२०१७ रोजी अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथे शहरी गरीब योजनेतून मोफत देण्यात येणा-या औषधांच्या पुरवठ्याबाबत

(२६) ८८४५३ (२३-०८-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे शहरी गरीब योजनेतून मोफत देण्यात येणाऱ्या औषधांचा पुरवठा तांत्रिक कारखाने बंद झाल्याने महागडया औषधांसाठी गरीब रुग्णांना महानगरपालिकेच्या रुग्णालयात जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने तातडीने निवीदा प्रक्रिया राबवून येथील गरीब रुग्णांना औषधाचा नियमित पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१) व (२) पुणे महानगरपालिकेमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या व एक लाख रूपयापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबांसाठी शहरी गरीब योजना राबविण्यात येते.

या योजनेंतर्गत गरीब रूग्णांना नियमितपणे औषधांचा पुरवठा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडून नागरिकांना वैद्यकीय सुविधांकरिता दवाखाने, रुग्णालये, पॉलिक्लिनिकची सुविधा मिळत नसल्याबाबत

(२७) ८९८१६ (२३-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडून नागरिकांना वैद्यकीय सुविधांकरिता दवाखाने, रुग्णालये, पॉलिक्लिनिकची सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरात स्वाईन फ्ल्यू, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया इ. संसर्गजन्य रोगांमुळे सन २०१७ या वर्षात अनेक रुग्णांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागावर झालेल्या खर्चाचे ऑडीट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने पुणेकरांना चांगल्या आरोग्य सेवा मिळण्याकरिता तसेच पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे विशेष ऑडीट करण्याचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेमध्ये ४६ बाह्यरूग्ण विभाग, १७ प्रसतिगृहे, १ सर्वसाधारण रूग्णालये व १ सांसर्गिक रूग्णांचे रूग्णालय तसेच ३ फिरती रूग्णालये उपलब्ध आहेत. सुमारे ६ ते ७ हजार रूग्ण बाह्य रूग्णालयाचा लाभ घेतात.

अनियमित व दिर्घकाळ पावसामुळे किटकजन्य तसेच विषाणूजन्य आजारांचा प्रादूर्भाव पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वाढला होता, ही वस्तुस्थिती आहे.

• सदरच्या आजारावर प्रतिबंध करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी खालील उपाययोजना करण्यात येतात :-

- साथीच्या रोगाचे नियमित सर्वेक्षण.

- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी किटकनाशक औषधांची फवारणी व धुम्रफवारणी.
- श्वासामार्फत प्रसारण होणाऱ्या विषाणूजन्य बाधीत रूग्णांवर लक्षणाच्या वर्गीकरणानुसार उपचार.
- सार्वजनिक क्षेत्रातील आरोग्य अधिकारी व निम्न वैद्यकीय कर्मचारी व खाजगी वैद्यकीय व्यावसायीक यांना पावसाळा व त्यानंतर उद्भवणाऱ्या आजारांचे निदान, उपचार प्रतिबंध व नियंत्रण याबाबत प्रशिक्षण.
- साथीच्या रोगाच्या निदानासाठी आवश्यक प्रयोगशालेय सुविधा.
- औषध व इतर साधन सामुग्रीचा आवश्यक साठा.
- घनकचरा व्यवस्थापन, जल, अतिक्रमण, ड्रेनेज इत्यादी विभागांशी समन्वय.
- विविध जनसंपर्क माध्यमातून लोक प्रबोधन.
- डासोत्पत्तीस कारणीभूत व्यक्ती/संस्था यांना ही स्थाने नष्ट करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत एच-१ एन-१ लसीकरण करण्यात येते. तसेच रूग्णांना मोफत औषधे पुरविली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विक्रेता व्याख्या निश्चित करुन शहर फेरीवाला समिती त्वरीत गठीत करण्याबाबत

(२८) ८९९६१ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने मंजूर केलेल्या पथ विक्रेता अधिनियम सन २०१४ च्या अनुषंगाने राज्यात पदपथ धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता विक्रेत्यांचे सर्वेक्षण, प्रमाणपत्र, ओळखपत्र देणे, अपीलीय प्राधिकरणाची नियुक्ती करण्याकरीता दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासन निर्णय जारी केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नगरविकास विभागाने अद्याप फेरीवाल्यांची व्याख्या निश्चित केली नसल्याने शहर फेरीवाला समिती अद्याप गठीत होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'स्ट्रिट व्हेंडर ॲक्ट' अंतर्गत दिनांक १ मे, २०१४ पूर्वीपासूनच्या विक्रेत्यांना संरक्षण देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी निर्णय दिला आहे परंतू दिनांक १ मे, २०१४ पूर्वीच्या फेरीवाल्यांची पात्रता निश्चित करण्याकरिता कोणकोणती कागदपत्रे ग्राहय मानण्यात आली आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने विक्रेता व्याख्या निश्चित करुन व शहर फेरीवाला समिती त्वरीत गठीत करुन विक्रेत्यांच्या सर्वेक्षणासाठी विशेष व्यापक अभियान राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) : (१) व (२) केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१४ पासून पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी नियमावली व कलम ३८(१) नुसार दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना प्रसिध्द केली आहे.

सदर योजना प्रसृत झाल्यानंतर, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यानंतर, प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन शासकीय विभाग व इतर मंडळे यांची शहर फेरीवाला समिती गठीत करण्यात येत आहे.

(३) पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना नुसार पथविक्रेता म्हणून नोंदणी करण्यासाठीचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-

- तो/ती भारताचा नागरिक असावा/असावी
- महाराष्ट्रातील अधिवासी असावा/असावी
- सर्वेक्षणाच्या दिनांकास पथविक्रेत्याचे वय १४ वर्षांपेक्षा कमी असणार नाही
- पथविक्रीखेरीज उपजीविकेची इतर कोणतीही साधने असणार नाहीत.

(४) व (५) सदर योजनेतील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

भिवंडी-कल्याण व भिवंडी-ठाणे रस्त्यांवर पथदिवे नसल्याबाबत

(२९) ९०१२३ (२३-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-कल्याण व भिवंडी-ठाणे रस्त्यांचे रुंदीकरण केले परंतू या रस्त्यांवर पथदिवे नसल्याने या मार्गावर वाहनांच्या अपघातात वाढले असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भिवंडी-कल्याण व भिवंडी-ठाणे या मार्गावरील रस्त्यांवर पथदिवे लावून या मार्गातील अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अहवालानुसार महानगरपालिकेने सदर मार्गावर अपघात रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत:-

- भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेची नदीनाका ते अंजुर फाटा जकात नाक्यापर्यंत हद्द असुन या रस्त्यांवर महानगरपालिकेने पथदिव्यांची व्यवस्था केलेली आहे. तसेच रांजनोली नाका ते कल्याण व अंजुर फाटा ते ठाणे हे रस्ते भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत येत नाहीत.
- तथापि, या रस्त्यावर पथदिव्यांची व्यवस्था करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पोयसर येथील पाणथळ पात्रात होत असलेले डम्पिंग रोखण्याबाबत

(३०) ९१३०३ (२३-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिमेला (मुंबई) लालजीपाडा आणि मीठ चौकीच्यामध्ये आंबेडकर नगरजवळ लिंकरोडवर पोयसर नदीचा एक प्रवाह खारफुटीला मिळत असून या प्रवाहाला जनकल्याण नगर नाला असे संबोधले जात असून या पात्रात सध्या ८ ते १० फूट रुंदीचे काँक्रिटीकरण सुरु आहे या कामापासून अवघ्या काही मीटर अंतरावर असलेल्या पाणथळ जागेत माती, दगड, रेती, कचरा, सिमेंटचा ढीग साचला असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोयसर येथील पाणथळ पात्रात होत असलेले डम्पिंग रोखण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपायोजना करणार वा करित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) मालाड (पश्चिम) लालजीपाडा आणि मीठ चौकीच्या मध्ये मालाड खाडी येत असून, सदर खाडीच्या पूर्वेकडे पोयसर उपखाडी व वलनाई उपखाडी आणि पश्चिमेकडे जनकल्याण उपखाडी मिळते.

मालाड खाडीच्या पूर्वेस पोयसर उपखाडी व वलनाई उपखाडी यांच्यामध्ये एक भूखंड असून, माहे मार्च, २०१७ पासून सदर भूखंडावर माती, दगड, रेती, कचरा, सिमेंटचा ढीग टाकला जात आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत, मालाड खाडीच्या पश्चिमेस असलेल्या जनकल्याण नगर या उपखाडीचे बांधकाम करण्यासाठी मार्च २०१६ ते २०१७ पर्यंत बांधकाम यंत्रसामुग्रीची ने-आण करण्याकरिता पोहोच मार्ग बनविण्यासाठी उपखाडीत भराव टाकण्यात आला होता.

सदर भराव महानगरपालिकेमार्फत मे, २०१७ च्या अखेरीस पूर्णपणे काढून टाकण्यात आला असून, पाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

तसेच, सदर ठिकाणी उपद्रव शोधकांमार्फत अनधिकृतपणे भरणी करणाऱ्या गाडयांवर महानगरपालिकेमार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असून, भरणी करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलीस ठाणे व कांदळवन कक्ष यांना कळविण्यात आले आहे.

अमळनेर शहरात अतिक्रमणामुळे प्रमुख रस्ते व्यापले असल्याबाबत

(३१) ९१३३३ (२३-०८-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर शहरात अतिक्रमणामुळे प्रमुख रस्ते व्यापले गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराच्या मध्यभागातून धुळे-अमळनेर-चोपडा हा राज्यमार्ग असल्यामुळे वाहनांची वर्दळ सतत असून शहरातील अतिक्रमणांनी व्यापलेले रस्ते, बेकायदेशीर वाहतूक, अवैध पार्किंग इत्यादीसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने शहरातील १२८१ सह इतर अतिक्रमण काढण्याचे आदेश दिल्यानंतरही नगरपालिकेकडून अतिक्रमणांना संरक्षण दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन अतिक्रमणांना संरक्षण देणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये नगरपरिषदेने कृती आराखडा तयार करुन १२८१ अतिक्रमणे काढून टाकण्यात आली आहेत. नगर परिषदेच्या रस्त्यावरील अतिक्रमणे काढणेकामी स्वतंत्र अतिक्रमण निर्मूलन पथकाची नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा नगरपरिषद (जि.जळगांव) रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या वारसग्रस्तांना नोकरीत समावून घेण्याबाबत

(३२) ९१९७७ (२३-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा नगरपरिषद (जि.जळगांव) सन १९९३ पूर्वीच्या रोजंदारीवरील परंतु नंतर नगरपरिषद सेवेत सामावून घेतलेल्या कर्मचा-यांचे वारसग्रस्त लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सामावून घेणेबाबतचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.नगरविकास राज्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ पासून वांरवार लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१८) : (१) या संदर्भातील ९ प्रस्ताव पाचोरा नगरपरीषद प्रशासनाकडे प्राप्त झाले होते.

(२) हे खरे नाही.

(३) रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय नाही. शासनाने दिनांक १०.०३.१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना विशिष्ट परिस्थितीत "एकवेळची विशेष बाब" म्हणून नियमीत सेवेत (अस्थायी आस्थापनेवर) सामावून घेण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय नाही. त्यानुसार वारसा हक्काचे प्रस्ताव पाचोरा नगरपरिषदेने निकाली काढलेले आहेत.

मुंबईतील रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतचे प्रकल्प "शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत" राबविण्याबाबत

(३३) ९२०३० (०१-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृहनिर्माण प्रकल्पातील अंतर्गत कलह, नोटाबंदी, विकासाकांकडील आर्थिक मंदी, महारेरातील सक्तीची नोंदणी अशा विविध कारणांमुळे मुंबईतील रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतचे प्रकल्प "शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत" राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्त्वाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच प्रस्तावाच्या मंजुरीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या मंजुरीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१२-०१-२०१८) : (१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ - B (४) (e) मधील तरतुदीप्रमाणे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या यंत्रणांनी जसे की, एमएमआरडीए, एमआयडीसी, म्हाडा इत्यादी व बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या जमीनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्वत: राबविल्यास त्यांच्या बरोबर शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित संयुक्त सहभाग घेईल.

खाजगी जमिनीवरील तसेच खाजगी विकासकांमार्फत राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून थेट सहभाग घेतला जाणार नाही.

(२) व (३) ज्या खाजगी विकासकांनी अशा झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्याच्या प्रामाणिक उद्देशाने तेथील झोपडपट्टीवासियांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करुन जमीन मोकळी केलेली असेल/करतील व विक्री घटकात साधारणपणे किमान ३५ टक्के आर्थिकदृष्टया दुर्बल घटक अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटांकरिता ३०-६० चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्रफळाची परवडणारी घरे बांधतील आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितने अग्रगण्य राष्ट्रीयीकृत बँकेच्या परामर्शाने निश्चित केलेल्या वाजवी मर्यादित किंमतीत विकण्याची तयारी दर्शवतील, केवळ अशा खाजगी विकासकांच्या परवडणाऱ्या घरांच्या क्षेत्रफळाइतक्या पुनर्वसन घटकास सुरुवातीचे भांडवल शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून उपलब्ध करण्याचे योजिले आहे.

अशा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विक्री घटकांकरीता अग्रगण्य राष्ट्रीयीकृत बँकेकडून बांधकाम निधी सहाय्य कर्ज उपलब्ध व्हावे, म्हणून शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून संस्थात्मक पाठबळ देण्याचे योजिले आहे. या दोन्हींचे व्याजासह वसुलीकरिता इस्क्रो अकाऊंट/डेसिगनेटेड अकाऊंट मॅकेनिझमचा अवलंब करण्याचा इरादा आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना अग्रगण्य राष्ट्रीयकीकृत बँकेकडून बांधकाम सहाय्य धोरणांतर्गत कर्जासाठी अनुषंगिक बाबी निश्चित करण्यात येत आहेत.

सदरहू राष्ट्रीयीकृत बँकेच्या दृष्टीने त्यांच्या धोरणानुसार बांधकाम सहाय्य वसुलीची उपाययोजना निश्चित झाल्यावरच योजित कार्यवाही मार्गी लागू शकेल.

योजित कार्यवाही अग्रगण्य राष्ट्रीयीकृत बँकेच्या धोरणाच्या अधिनस्त कार्यान्वित व्हावयाची असल्यामुळे विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेतील गैरव्यवहाराबाबत

(३४) ९३७७५ (२३-०८-२०१७). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत मुख्य खाते अंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकारी हाताशी धरून गृहनिर्माण सोसायटीमध्ये अंतर्गत रस्ते हे महानगरपालिकेतील डांबर आणि खडी वापर करुन केल्याचे निदर्शनास येत आहे,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेतील विधी व सल्लागार कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी मिळून ठराविक लोकांना फायदा होईल अशा दृष्टीने कामकाज करीत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे कर्मचारी व अधिकारी मिळून महापालिकेचा फायदा किंवा हित न जपता आपल्या फायद्यासाठी महानगरपालिकेचे नुकसान करित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) याप्रकरणी मा.विधानसभा सदस्यांची तक्रारी प्राप्त झालेली असून सदर तक्रार यथाशिघ्र चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस पाठविण्यात आली आहे. त्याचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी कोळीवाडा (मुंबई) येथे रिंग रोड तयार करण्याबाबत

(३५) ९४८३३ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी कोळीवाडा (मुंबई) येथे रिंग रोड तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी कोळीवाडा येथे रिंग रोड तयार करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) वरळी, कोळीवाडा (मुंबई) येथे रिंग रोड तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आलेली नाही.

(२) सद्य:स्थितीत वरळी कोळीवाडा येथे एकमेव जाणारा रस्ता असून, सदर रस्त्याचे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी परिरक्षण करण्यात येते.

वरळी कोळीवाडा येथे सद्य:स्थितीत कोणताही रिंगरोड अस्तित्वात नसून, संपूर्ण क्षेत्र हे समुद्रापर्यंत बांधकामांनी व्यापलेले आहे.

तसेच, सदर ठिकाणी सद्य:स्थितीत सन १९९१ च्या मंजुर पुनर्रचित विकास आराखडयात तसेच, प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये कोणताही रिंगरोड प्रस्तावित करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील पुतळ्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत

(३६) ९४८६२ (२३-०८-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महापुरुष आणि क्रांतिकारी नेत्यासह सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या थोरांच्या आठवणी आणि त्यांच्या कामाची प्रेरणा नागरिकांना मिळावी यासाठी पुतळ्यांची स्थापना करण्यात आली आहे. मात्र अनेक पुतळ्यांच्या अवतीभोवती कायमची अस्वच्छता, विजेची गैरसोय, सुरक्षारक्षक नसणे, भिक्षेकारींचा वावर, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित नसणे अशी दुरवस्था सर्वत्र आढळल्याचे माहे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठराविक पुतळे वगळता अनेक पुतळ्याभोवती असणारी अस्वच्छता आणि विविध गैरसोयी, सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे काही दिवसांपूर्वी एका उद्यानातून पुतळा हटविण्यात आल्याचे निदर्शनास आले असून अशा घटनांमुळे शहरात सामाजिक ऐक्य बाधित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२) व (३) पुणे शहरातील पुतळ्यांच्या अवतीभोवती कायमची स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधित भागातील कर्मचाऱ्यामार्फत दक्षता घेण्यात येते. त्याशिवाय पुण्यतिथी व जयंती या दिवशी अग्निशमन विभागाकडून पुतळे स्वच्छ करण्यात येतात आणि आवश्यक वाटल्यास रंगरंगोटी करण्यात येते.

पुतळ्यांच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. पुतळ्याजवळ सुरक्षा रक्षक व सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित ठेवणे अडचणीचे आहे. तथापि, अतिदक्षता ठिकाणी सुरक्षारक्षक व सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित ठेवली आहे.

काही ठिकाणी भिकाऱ्यांचा वावर असून त्यांच्यावर कारवाई केली जाते. त्यामुळे पुतळ्यांभोवती असणारी अस्वच्छता व विविध गैरसोयी होतात असे म्हणणे उचित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (पश्चिम) येथील शेकावत मेन्शन व मिस्त्री हाऊस अशा दोन इमारती दुरुस्ती करण्याबाबत

(३७) ९४९२० (२१-०९-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पश्चिम) एस.व्ही.रोड येथील शेकावत मेन्शन व मिस्त्री हाऊस अशा दोन इमारती माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मोडकळीस आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक रहिवाशी व भाडेकरु हे जीव मुठीत धरुन मोडकळीस आलेल्या इमारतीत रहात असून घर मालक, विकासक व मुंबई महानगरपालिका यांनी संगनमत करुन दुरुस्ती परवाना देण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन घर मालक, विकासक व मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) जोगेश्वरी पश्चिम येथील एस.व्ही. रोडवरील शेखावती मेन्शन व मिस्त्री हाऊस या इमारती अंदाजे ५० वर्षे जुन्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या संरचनात्मक परिक्षणामध्ये सदर इमारती धोकादायक असल्याबाबतचा अहवाल देण्यात आला होता. तद्नंतर सदर इमारतींतील रहिवांशानी केलेल्या संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार सदर इमारतींची दुरुस्ती करता येऊ शकते असे नमूद करण्यात आले होते.

सदर विसंगत संरचनात्मक परिक्षण अहवाल तांत्रिक सल्लागार समितीसमोर सादर करण्यात आला असता, सदर समितीने सदर इमारती धोकादायक असल्याबाबतचा अहवाल दिनांक २४.०७.२०१५ रोजी दिला.

सदर समितीच्या अहवालानुसार, सदर इमारतींना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली.

सदर इमारतीतील रहिवाशांनी सदर प्रकरणी "जैसे थे" आदेश मिळविण्याकरिता मा.नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे दाखल केलेला दावा मा.न्यायालयाने फेटाळला.

तद्नंतर सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात A.O. (St) ३४६०१/२०१५ अन्वये दाखल केलेल्या अपीलात मा. न्यायालयाने "जैसे थे" आदेश दिले आहेत.

सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

वरळी (मुंबई) येथील बी.डी.डी.चाळींच्या विकासासाठी चिनी कंपन्यांनी निविदा भरल्या असल्याबाबत

(३८) ९४९२६ (२१-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील बी.डी.डी. चाळींचा विकास होणार असून पहिल्या टप्यात ५२ एक्कर जागेवरील चाळींचा पुनर्विकास होणार असून १० हजार ७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी म्हाडाने निविदा मागविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदांमध्ये ३ विदेशी कंपन्यांचा सहभाग असून यात चिनच्या २ कंपन्यांनी निविदा भरल्या असल्याचे दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (०३-०१-२०१८) : (१) होय.

(२) दि. २८.०७.२०१७ रोजी दुपारी १.०० वा. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर निविदामध्ये ३ विदेशी कंपन्यांचा सहभाग असून, यात चिनच्या २ कंपन्यांनी निविदा भरल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) न्यायालयीन प्रकरणामुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे.

मुंबई महानगरपालिका रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना औषधे मोफत पुरविणेबाबत

(३९) ९४९२९ (२१-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना १७१ प्रकारची औषधे मोफत पुरविण्यात येत असून यासाठी दरवर्षी करोडो रुपये खर्च केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामधील जेमतेम २० ते २५ प्रकारची औषधे रुग्णांना मिळत असून इतर औषधे रुग्णांना बाहेरून खरेदी करावे लागत असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयामध्ये उपचारासाठी गरीब कुटुंबातील रुग्ण येत असतात त्यांना बाहेरून जास्त किंमतीची औषधे विकत घेणे परवडत नाही त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना आवश्यक औषधे मोफत पुरविणेबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना आवश्यक औषधे मोफत पुरविणेबाबत महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

• मोफत दिल्या जाणाऱ्या जीवरक्षक औषधांच्या द्विवार्षिक मागणीनुसार तयार केलेल्या अनुसूचीवरील औषधांची खरेदी रुग्णालय स्तरावर करण्यात येते.

• अनुसूचीवरील औषधे अथवा अनुसूची उपलब्ध नसल्यास, औषधांचा पुरेसा साठा महानगरपालिकेच्या रुग्णालयांत असावा याकरिता आवश्यक बाबींची खरेदी स्थानिक पातळीवर करण्याकरिता रुग्णालय प्रमुख यांचेकडून कार्यवाही करण्यात येते.

• महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांत उपचाराकरिता दाखल होणाऱ्या रुग्णांकरिता आवश्यक औषधांची अनुसूची तयार करण्यात येते व महानगरपालिकेमार्फत निविदा मागवून पुरवठादारांची नियुक्ती करण्यात येते.

• विविध अनुसूचीवरील जीवरक्षक औषधे रुग्णालयांच्या स्तरावर खरेदी करण्यात येतात.

• अनुसूचीचा कालावधी संपुष्टात आल्यास व पुढील कालावधीकरिता अनुसूचीच्या निविदांचे कामकाज काही तांत्रिक कारणांमुळे पूर्ण न झाल्यास मागील कालावधीच्या अनुसूचीतील पुरवठादारांकडून त्याच किंमतीमध्ये जीवरक्षक औषधांची खरेदी रुग्णालय स्तरावर आवश्यकतेनुसार करण्यात येते.

• काही जीवरक्षक औषधे अनुसूचीवर उपलब्ध नसल्यास अश औषधांची रुग्णालय स्तरावर स्थानिक बाजारातून दरपत्रिका मागवून आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येते.

• अपवादात्मक परिस्थितीत दारिद्रय रेषेखालील रुग्णांना महागडी जीवरक्षक औषधे खरेदी करावयास लागल्यास रुग्णालयातील मेडिकल सोशल वर्कर यांचेमार्फत "गरीब रुग्ण सहाय्यता निधी" मधून मदत मिळवून देण्यात येते.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांत औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

मुंबई महानगरपालिकेची काही रुग्णालये, प्रसूतिगृहे, दवाखाने आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लॅब तंत्रज्ञाची पदे रिक्त असल्याबाबत

(४०) ९४९३० (२१-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेची काही रुग्णालये, प्रसूतिगृहे, दवाखाने आणि प्राथमिक आरोग्यकेंद्रांमध्ये लॅब तंत्रज्ञाची भरती होऊनही काही पदे रिक्त असल्याची माहिती दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास माहितीच्या अधिकारांतर्गत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या आर/दक्षिण, रे रोड प्रसूतिगृह, एच पूर्व विभागातील कोळे कल्याणनगर आरोग्य केंद्र, के पश्चिम विभागातील बनाना लिफ दवाखाना, मिल्लतनगर दवाखाना, एन विभागातील नाथ पै गरोडियानगर येथील दवाखाना, आर/दक्षिण विभागातील संभाजीनगर, आर/उत्तर विभागातील आनंदनगर, आर.एन विभागातील शास्त्रीनगर, एल विभागातील हिमालय को. ऑप. हौ. सोसायटी, नारीसेवा सदन येथील आरोग्य केंद्र, जोगेश्वरी येथील राममंदिर रोड, येथील आरोग्य केंद्र आणि नाहूर पूर्व येथील आरोग्य केंद्र अशा एकंदर १२ ठिकाणी एकही लॅब तंत्रज्ञ नसल्याचेही दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे गरीब रुग्णांची गैरसोय होत असून याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१८) : (१) सन २०१५ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख व उपनगरीय रुग्णालयांमधील प्रसुतीगृहे व दर्जोन्नत दवाखान्यामधील रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरातीद्वारे अर्ज मागवून रितसर निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती.

सदर भरतीदरम्यान मागासवर्गीय व दिव्यांगाकरिता आरक्षित असलेली काही पदे सुयोग्य उमेदवारांअभावी रिक्त राहिली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

• एच/पूर्व विभागातील कोळे कल्याणनगर दवाखाना, के/पश्चिम विभागातील बनाना लिफ दवाखाना व मिल्लतनगर दवाखाना, आर / उत्तर विभागातील आनंदनगर दवाखाना, एल

विभागातील हिमालय को.ऑ.सो. नारीसेवा सदन येथील दवाखाना व आरोग्य केंद्र या ठिकाणी प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध आहेत.

• नाहूर (पूर्व) येथील दवाखान्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

• रे रोड प्रसुतीगृहाची इमारत निष्कासित करुन त्या जागी सार्वजनिक-खाजगी सहभाग अंतर्गत कॅन्सर रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे.

• आर/दक्षिण विभागातील संभाजी नगर येथील दवाखाना अद्याप कार्यरत झालेला नाही.

• जोगेश्वरी राम मंदिर रोड येथील आरोग्य केंद्रात प्रयोगशाळेची सुविधा नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत/आली आहे:-

• महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील दवाखाने, प्रसुतीगृहे, विशेष रुग्णालये व उपनगरीय रुग्णालये येथील नियमित तत्वावर प्रयोगशाळा तंत्रज्ञांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

• राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामार्फत कंत्राटी तत्वावर प्रयोगशाळा तंत्रज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

• महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांतील प्रयोगशाळा तंत्रज्ञ संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदांवर तदर्थ तत्वावर प्रयोगशाळा तंत्रज्ञ नेमण्यात आले आहेत.

पुणे, कर्वेनगर कमिन्स महाविद्यालय ते युनिव्हर्सल चौक दरम्यानच्या उड्डाणपुलाच्या कामाबाबत

(४१) ९५१८४ (०१-०१-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, कर्वेनगर कमिन्स महाविद्यालय ते युनिव्हर्सल चौकादरम्यानच्या उड्डाणपुलाचे काम मागील पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ मध्ये या उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर सन २०१५ पर्यंतची वाढीव मुदत संपून दोन वर्षे झाली तरी काम अर्धवट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१), (२) व (३) सदरचे काम संथ गतीने चालू असले तरी, सद्यस्थीतीत सुमारे ९५% काम झालेले आहे. याप्रकरणी विलंब लावणाऱ्या ठेकेदारास दि.१५/६/२०१५ पासून रु.६०००/- प्रतिदिन व दि.१/६/२०१७ पासून रु. १०,०००/- प्रतिदिन दंड

आकारण्यात येतो तसेच या दंडात्मक कारवाई व्यतिरिक्त दि.१५/६/२०१५ पासून भाववाढ सूत्राचे निर्देशांक गोठविण्यात आले आहेत.

(४) जागावरील विद्युत केबल स्थलांतरीत करणे, पाणीपुरवठ्याच्या लाईन स्थलांतरीत करणे तसेच निविदा अटी व शर्तीप्रमाणे कामाची गती ठेकेदाराने न राखल्यामुळे पूर्ण होणेस विलंब झालेला आहे.

पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्याबाबत

(४२) ९५६८२ (३०-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्यासाठी आणि तेथील नागरिकांचे पुनर्वसन करून या स्मारकांचा विस्तार करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.पालकमंत्री, पुणे यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील सावित्रीबाई फुले स्मारकातील शिल्पे व भित्तीचित्रे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) संबंधित शिल्पकाराकडून आजपर्यंत १२ पुतळे व २५ म्युरल्सचे कास्टींग करण्यात आले आहे. त्यापैकी २ पुतळे व २० म्युरल्स प्रत्यक्ष कामाचे जागेवर आणण्यात आली आहेत. १० पुतळयांचे स्टुडिओमध्ये पॉलिशिंगचे काम सुरु आहे. सदरचे काम सुरु आहे. सदरचे काम कलाकुसरीचे असलमुळे कामास वेळ लागत आहे. दोन महिन्यांमध्ये काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने ६१ नवीन बांधकामांना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिल्याबाबत

(४३) ९६३७५ (०२-०१-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान ३१ दिवसात विकासकांच्या ६१ नवीन बांधकामांना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिल्या प्रकरणी तक्रार मा.नगरविकास ,राज्यमंत्री यांच्याकडे केल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा.मंत्री महोदयांनी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निदर्शनास आले तदनुसार नगररचना विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

दि.१४/१०/२०१७ च्या दै.लोकसत्ता वृत्तपत्रातील या विषयाच्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगी, तसेच बांधकाम पूर्णत्वाचे दाखले ऑटो डी.सी.आर. प्रणालीद्वारे प्रदान करण्यात येतात.

माहे जुलै, २०१७ मध्ये बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्याकरीता ५६ प्रस्ताव प्राप्त झाले. सदर ५६ प्रस्तावांपैकी ४९ प्रस्ताव, तसेच जुलै, २०१७ पूर्वीचे फेरसादर केलेले १२ प्रस्ताव अशा एकूण ६१ प्रस्तावांना नियमानुसार छाननी करुन ऑटो डी.सी.आर. प्रणालीद्वारे बांधकाम पूर्णत्वाचे दाखले प्रदान करण्यात आले आहेत. जुलै, २०१७ मध्ये प्राप्त ५६ प्रस्तावांपैकी ७ प्रस्ताव त्रुटी असल्याने फेटाळण्यात आलेले आहेत.

सदर कार्यवाही नियमानुसार झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली(जि.ठाणे) २७ गावातील ग्रामीण भागात नागरिकांना
तीव्र पाणी टंचाई भासत असल्याबाबत

(४४) ९७९५१ (०३-०१-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील २७ गावातील ग्रामीण भागात तीव्र पाणी टंचाई भासत असल्याने नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार २७ गावातील पाण्याचा प्रश सोडविण्यासाठी जलसंधारण विभाग व एमआयडीसीकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

दि.०१ जून २०१५ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये २७ गावांचा समावेश करण्यात आला. या भागामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेल्या विविध नळ जोडण्यांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तथापि उंच भागात कमी दाबाने किंवा अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) सदर २७ गावांतील पाणी समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०२ मे, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत एप्रिल ते जून, २०१७ पर्यंत सरासरी ४८.५० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
- सदर भागातील पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यासाठी अस्तित्वातील नळ जोडण्यांचा आकार वाढविणे, नविन नळ जोडण्या घेणे, तसेच नळ जोडण्या स्थलांतरीत करणे या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
- अपुऱ्या पाणी पुरवठ्याबाबत मा.पालकमंत्री यांच्याकडे दि.०२/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार २७ गावांमध्ये १५० मी.मी. व्यासाच्या ३ नविन नळजोडण्या घेण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
- केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत सन २०४९ ची २७ गावांची लोकसंख्या व आवश्यक पाणी पुरवठा गृहित धरुन रु.१८०.८१ कोटींचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.
- सन २०१७-१८ च्या वार्षिक कृती आराखड्यात अमृत योजनेंतर्गत २७ गावांमध्ये पाणी पुरवठा योजना राबविण्याकरिता २८ जलकुंभ, १२ संप व २ जी.एस.आर. प्रस्तावित आहेत.
- २७ गावांच्या पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली असून, महानगरपालिकेमार्फत कामाची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील शिवाजी वाडी येथील जवाहरलाल नेहरु
राष्ट्रीय नागरी पुननिर्माण योजनेबाबत

(४५) ९८३८३ (०१-०१-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील शिवाजी वाडी येथील जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या घरकूल योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादीत स्थानिक नगरसेवक यांचे नातेवाईक तसेच आमदारांचे कार्यकर्ते यांचा समावेश करण्यात आल्याची तक्रार मा. मुख्यमंत्री व नगरविकास राज्यमंत्री, आयुक्त, नाशिक यांच्याकडे महानगरपालिकेच्या प्रभाग समितीच्या सभापतीने माहे ऑक्टोबर, २०१७ वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) : (१) होय.

याबाबत नाशिक महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाली होती.

(२) नाशिक महानगरपालिकेचे सहायक आयुक्त (स्लम) यांनी सुनावणी घेऊन तक्रारीबाबत तपासणी केली असता, सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला महानगरपालिकेमध्ये सन २०१२ पासून कर्मचाऱ्यांची बिंदू नामावली अद्ययावत न केल्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत

(४६) ९८८१९ (३०-१२-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये सन २०१२ पासून कर्मचाऱ्यांची बिंदू नामावली अद्ययावत न केल्याने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय नियमानुसार दर ३ वर्षानी बिंदूनामावली अद्ययावत करणे आवश्यक असतांना काही अधिकारी संगनमत करुन बिंदूनामावली करण्यास विलंब करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बिंदूनामावलीस विलंब चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१८) : (१) अकोला महानगरपालिका आस्थापनेवरील मंजूर पदाबाबतची बिंदूनामावली अद्ययावत केली नव्हती ही बाब खरी आहे.

तथापि, मागास वर्ग कक्ष विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांनी सन २००१-२००२ ते २०१५-२०१६ पर्यंतची सरळसेवा बिंदूनामावलीस दिनांक २५/०१/२०१६ रोजी मंजूरी दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) अकोला महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या बिंदूनामावलीस मंजुरी प्राप्त झालेली असल्याने, प्रस्तुत प्रकरणी शासन नियमानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

शहरातील रस्ते, उड्डाणपूल दर्शविणाऱ्या जाहिरातीतील छायाचित्रे हे राज्यातील एकाही शहराचा नसून तो बँकॉक शहराची असल्याबाबत

(४७) १००४२४ (०६-०१-२०१८). श्री.अजित पवार (बारामती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तीन वर्षपूर्तीच्या मुहूर्तावर 'आपले सरकार कामगिरी दमदार' अशा नावाने मोठ्या प्रमाणात जाहिराती केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकासशी संदर्भातील जाहिरातीमध्ये वापरण्यात आलेला 'शहरातील रस्ते, उड्डाणपूल दर्शविणारे छायाचित्रे' हे राज्यातील एकाही शहराचा नसून तो बँकॉक शहराचा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नगरविकासाची जाहिरात करताना परदेशातील शहरांचे छायाचित्र वापरणे योग्य नसल्याने माहिती व जनसंपर्क विभागावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

आपले सरकार कामगिरी दमदार हे घोषवाक्य एक वर्षापूर्वी शासकीय माहितीवर आधारित संदेशात उपयोगात आणण्यात आले होते.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

त्रिमुर्ती प्रांगण, मंत्रालय येथील छोटेखानी प्रदर्शनासाठी एकूण सुमारे ५० पॅनल्स तयार करण्यात आले होते. त्या पॅनलपैकी एका पॅनलवर नगराचे नवनिर्माण या मथळयाखाली शहरांच्या बदलत्या स्वरुपाबद्दल माहिती देण्यात आली होती. त्यात नमुन्यादाखल २ छायाचित्रांचा उपयोग करण्यात आला होता. त्यापैकी एक छायाचित्र साधारण शहराचे तर दुसरे छायाचित्र झगमत्या शहराचे होते. सदर छायाचित्रे पॅनल्सच्या डिझाईनचा भाग म्हणून दाखविण्यात आली होती. या प्रकरणी कोणतीही दिशाभूल वा फसवणूक करण्यात आलेली नाही.

माहिती आणि जनसंपर्क विभाग सक्षम करण्याबाबत

(४८) १००५०९ (३०-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कामाची व धोरणात्मक निर्णयांची प्रसिध्दी शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे स्वतःचा माहिती आणि जनसंपर्क विभाग असतानाही शासन जाहिराती करण्याकरिता खाजगी कंपन्यांना ३०० कोटी रुपये अदा करणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच शासन आपला माहिती आणि जनसंपर्क विभाग सक्षम करण्याकरिता कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) : (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) लोकराज्य मासिक ५ भाषांमधून प्रकाशित, मंत्रालयामध्ये चित्रिकरणासाठी अद्ययावत स्टुडिओची उभारणी, माध्यम प्रतिसाद केंद्राची उभारणी, महाराष्ट्र वार्षिकीचे प्रकाशन, दिलखुलास, मी मुख्यमंत्री बोलतोय, जय महाराष्ट्र या सारख्या कार्यक्रमांची निर्मिती व प्रसारण, संवाद पर्व, महाराष्ट्र माझा या सारख्या कार्यक्रमांची अंमलबजावणी, तसेच या कार्यक्रमासाठी मागील ३ वर्षामध्ये भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली.

पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील रोजंदारी रखवालदारांना नोकरीत कायम करण्याबाबत

(४९) १०१०४७ (१९-१२-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील पुणे महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवर २६९ रोजंदारी रखवालदार सन २०१० पासून सेवेत कार्यरत आहे ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची नेमणूक करताना दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व पुणे महानगरपालिकेच्या मेडिकल बोर्डा समोर आरोग्य तपासणी करण्यात येऊन सेवा पुस्तके भरून घेण्यात आली व जात पडताळणी करून घेतल्यानंतर प्रशासनाने त्या आधारे रखवालदारांना कामावर रुजू करून घेतले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास ठराव क्र.३५७ द्वारे मंजूर करून शिक्षण मंडळातील शिपाई व रोजंदार रखवालदारांना कायम करण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापही सदर ठरावाबाबत महानगरपालिका स्तरावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील रोजंदारी रखवालदारांना नोकरीत कायम करण्याबाबतचा प्रलबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार वा करित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील शिक्षण मंडळामध्ये रोजंदारीवरील नियुक्त केलेले रखवालदार कार्यरत असून अशा सुमारे २६९ रखवालदारांच्या नियुक्तीबाबत आदेश मिळण्यासाठीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झालेला आहे.

या प्रकरणी शासनस्तरावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा भाईदर (जि.ठाणे) महानगरपलिकेचे प्रभाग अधिकरी यांचेवर कारवाई करण्याबाबत

(५०) १०२९८६ (०३-०१-२०१८). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपलिकेचे प्रभाग अधिकरी श्री.अविनाश जाधव यांनी नगरिकांना शिवीगाळ केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तेथिल स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपलिका यांचेकडे तक्रार केली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपलिका यांनी श्री.अविनाश जाधव यांचेवर अद्याप कोणतीच कारवाई न करता लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासन संबंधितांवर कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका याच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, श्री.अविनाश जाधव, प्रभाग अधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्यावर ठपका ठेवून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.